# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

(सायंकाळ)

दिनांक २१.०४.२०२६ मंगळवार

**मा. न्यायालयातुन आरोपीला सश्रम कारावासाची शिक्षा :—**

दिनांक २१.०४.२०२६ रोजी मा. ३ रे अति. जिल्हा व सत्र न्यायाधीश, नागपुर, श्री. एस. एच. ग्वालानी साहेब यांनी त्यांचे कोर्टाचे केस क्र. २८१/२०२३ मधील, पोलीस ठाणे जरीपटका येथील अप. क्र. २२७/२०२३ कलम ३७६(२)(आय),३७६(अ,ब),३५४,५०६ भादंवि सहकलम ४,८ पोक्सो या गुन्ह्यातील आरोपी महेंद्र उर्फ विजय भारती वसंतराव गजभिये वय ५३ वर्षे, रा. कुशीनगर, गल्ली क्र. ३, जरीपटका, नागपुर याचेविरूध्द साक्षी पुराव्याअंती गुन्हा शाबीत झाल्याने, आरोपीस कलम ३५४ भांदवि अन्वये ०५ वर्षे सश्रम कारावासाची शिक्षा व ५,०००/— रू. दंड आणि दंड न भरल्यास ०६ महीने अतिरीक्त साध्या कारावासाची शिक्षा, तसेच कलम ५०६ भांदवि अन्वये ०१ वर्षे सश्रम कारावासाची शिक्षा व १,०००/— रू. दंड आणि दंड न भरल्यास १५ दिवस अतिरीक्त साध्या कारावासाची शिक्षा, कलम ८ पोक्सो अन्वये ०३ वर्षे सश्रम कारावासाची शिक्षा व ५,०००/— रू. दंड आणि दंड न भरल्यास ०३ महीने अतिरीक्त साध्या कारावासाची शिक्षा, कलम ९(एम), १० पोक्सो अन्वये **०७ वर्षे सश्रम कारावासाची** शिक्षा व १०,०००/— रू. दंड आणि दंड न भरल्यास ०१ वर्ष अतिरीक्त साध्या कारावासाची शिक्षा ठोठावली.

दिनांक ०२.०४.२०२३ चे २१.०० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे जरीपटका हद्दीत राहणाऱ्या फिर्यादीची अल्पवयीन मुलगी हि तिचे मैत्रिणीसोबत खेळत असतांना, यातील आरोपीने तेथे येऊन मुलगी व तिचे मैत्रिणीसोबत अश्लिल कृत्य करुन लैंगिक अत्याचार केला. तसेच पिडीतेची मावसबहिण तेथे येऊन दोन्ही पिडीत मुलींना घेऊन जात असता, आरोपीने तिला घटनेची कोणालाही माहिती दिल्यास पाहून घेण्याची धमकी दिली. फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे जरीपटका येथे आरोपीविरूध्द गुन्हा नोंदविण्यात आला होता. आरोपीस दिनांक ०३.०४.२०२३ रोजी अटक करण्यात आली होती.

गुन्ह्याचे तत्कालीन तपासी अधिकारी मपोउपनि. श्रीमती रुपाली फटींग यांनी मा. कोर्टात तपासाअंती दोषारोपपत्र सादर केले होते. सदर खटल्यात सरकारी अभियोक्ता म्हणून ॲड. श्रीमती दीपिका गौरी मॅडम यांनी तर, आरोपीतर्फे ॲड. श्री हेमंत झा यांनी काम पाहिले. सदर गुन्ह्यात कोर्ट पैरवी अधिकारी पोहवा. योगेश बोंद्रे व मपोहवा प्रतिमा कानेकर यांनी काम पाहिले.

(गुन्हे)

**पोलीस ठाणे गिट्टीखदान :— दुकान फोडणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

पोलीस ठाणे गिट्टीखदान हद्दीत, फ्लॅट नं.१०१, निकुंजलिला अपार्टमेंट, वृंदावन कॉलोनी, काटोल रोड, नागपुर येथे राहणारे फिर्यादी पंकजकुमार सुरेश वर्मा वय ४० वर्षे यांचे वृंदावन कॉलोनी, काटोल रोड, नागपुर येथे विष्णु किराणा ॲन्ड जनरल स्टोअर्स नावाचे दुकान आहे. दिनांक २०.०४.२०२६ चे २३.०० वा.

ते दिनांक २१.०४.२०२६ चे ०६.०० वा. चे दरम्यान फिर्यादी यांनी आपले दुकानाला कुलुप लावुन घरी गेले असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे दुकानाचे शटरचे कुलूप तोडून, शटर उचकटवून आत प्रवेश करुन दुकानाचे गल्ल्यातील रोख ४५,०००/—रू. तसेच, दुकानातील फल्लीतेल, सोयाबीन तेल, सनफ्लॉवर तेल इत्यादी तेलाचे पॉकेट व डबे, बिस्कीट बॉक्स, तेलाचे बॉक्स, चॉकलेट बॉक्स तसेच तांदुळ व तुरदाळीचे कट्टे, सीसीटिव्हीचा डिव्हीआर असा एकुण किंमती २,८५,४००/—रू. चा मुद्देमाल चोरून नेला.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे गि्टीखदान येथे पोउपनि. राजेश पुरी ७०३८६०८८०७ यांनी अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ),३३४(१),३३१(४),३२४(२),भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

(अकस्मात मृत्यू)

**<u>पोलीस ठाणे हिंगणा</u>:—** ट्रकचालक नामे विवेक भिमराव ठाकरे वय २४ वर्ष रा. कोअलिया, ता. मुलताई जि. बैतुल, मध्यप्रदेश हे ट्रक क्र. एमएच ४० सीएन ७९४० मध्ये सरकी भरुन वणी येथून समृध्दी महामार्गाने जबलपूर रोडकडे जात असतांना दिनांक २०.०४.२०२६ चे २२.०० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे हिंगणा हद्यीत समृध्दी सर्कल, गेल गॅस सबस्टेशन समोर नमुद ट्रकचालकाचे ट्रकवरील नियंत्रण सुटल्याने ट्रक पलटी होऊन त्याखाली दबून गंभीर जखमी झाले. त्यांना उपचाराकरीता एम्स् हॉस्पिटलयेथे दाखल केले असता, उपचारादरम्यान दिनांक २१.०४.२०२६ चे ०१.१५ वा. सुमारास डॉक्टरांनी त्यांना तपासून मृत घोषीत केले.

यापकरणी प्राप्त वै़द्यकीय सुचनेवरुन पोलीस ठाणे सोनगाव येथे पोहवा विजय कळसकर ७९७२२३६०९० यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**(मिसिंग)**

**<u>१) पोलीस ठाणे कोतवाली</u>:—** रविकिरण अरुण गेडाम वय ५१ वर्षे रा. नताडा, ग्रामपंचायत जवळ, वर्धा हे दिनांक १०.०४.२०२६ रोजी पोलीस ठाणे कोतवाली हद्दीतून नातेवाईकाचे राहते घरी कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेले. घरी परत आले नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आले नाही. **<u>वर्णन</u>** रंग—सावळा, चेहरा— लांब, बांधा— मध्यम, उंची — ५ फुट ८ इंच, डोक्यावर टक्कल, अंगात— क्रिम रंगाचा शर्ट व काळया रंगाचा फुलपॅन्ट घातलेला आहे. भाषा— मराठी/हिंदी बोलतात.

**<u>२) पोलीस ठाणे कोतवाली</u>:—** महेश गणपत कोहळे वय ३५ वर्षे रा. गणेश मंदीरजवळ, शिवाजीनगर, कोतवाली, नागपूर हे दिनांक ०९.०४.२०२६ चे ०६.०० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे कोतवाली हद्दीतील राहते घरी कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेले. घरी परत आले नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आले नाही. **<u>वर्णन</u>** रंग—सावळा, चेहरा—लांब, बांधा—सडपातळ, उंची —५ फुट ५ इंच, डोक्याचे केस काळे, भाषा— मराठी/हिंदी बोलतात.



रविकिरण



महेश

(ईतर)

**आरोपींनी न्यायालयात हजर होणेबाबत :–**

मा. विद्यमान न्यायाधीश यांनी त्यांचे कोर्टातील केस क्र. व कलम मधील खालील नमुद आरोपी/साक्षीदार हे तारखेवर सतत गैरहजर राहत असल्याने त्यांचेविरुध्द जाहीरनामा प्रसिध्द केला आहे. खालील तक्त्यात नमुद आरोपी / साक्षीदार यांनी नमुद तारखेपर्यंत मा. न्यायालयासमोर हजर व्हावे.

| अ | कोर्टाचे नाव | केस क्र. | कलम | आरोपीचे नाव व पत्ता | पेशी तारीख |
|---|---|---|---|---|---|
| १. | मा. ३रे सहदिवाणी न्यायाधीश क.स्तर व प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी, नागपूर | ३२५११४६ /२००५ | कलम १३८ एनआय ॲक्ट | अमन के. हेमानी रा. हेमानी एन्क्लेव्ह, ९०, कॅनाल रोड, रामदासपेठ, नागपुर | ०४.०५.२०२६ |
| २ | मा. ३ रे सहदिवाणी न्यायाधीश क.स्तर व प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी, नागपूर | ३२८५८०९ /२००५ | कलम १३८ एनआय ॲक्ट | अमन के. हेमानी रा. हेमानी एन्क्लेव्ह, ९०, कॅनाल रोड, रामदासपेठ, नागपुर | ०४.०५.२०२६ |
| ३. | मा. ३रे सहदिवाणी न्यायाधीश क.स्तर व प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी, नागपूर | ३२८५२५२ /२००५ | कलम १३८ एनआय ॲक्ट | अमन के. हेमानी रा. हेमानी एन्क्लेव्ह, ९०, कॅनाल रोड, रामदासपेठ, नागपुर | ०४.०५.२०२६ |
| ४. | मा. ३रे सहदिवाणी न्यायाधीश क.स्तर व प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी, नागपूर | ३२८५४६३ /२००५ | कलम १३८ एनआय ॲक्ट | अमन के. हेमानी रा. हेमानी एन्क्लेव्ह, ९०, कॅनाल रोड, रामदासपेठ, नागपुर | ०४.०५.२०२६ |
| ५. | मा. ३रे सहदिवाणी न्यायाधीश क.स्तर व प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी, नागपूर | ३२५३६१६ /२००५ | कलम १३८ एनआय ॲक्ट | अमन के. हेमानी रा. हेमानी एन्क्लेव्ह, ९०, कॅनाल रोड, रामदासपेठ, नागपुर | ०४.०५.२०२६ |
| ६. | मा. ३रे सहदिवाणी न्यायाधीश क.स्तर व प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी, नागपूर | ३२८०८१२ /२००५ | कलम १३८ एनआय ॲक्ट | अमनराज हेमानी रा. हेमानी एन्क्लेव्ह, ९०, कॅनाल रोड, रामदासपेठ, नागपुर | ०४.०५.२०२६ |
| ७ | मा. ३रे सहदिवाणी न्यायाधीश क.स्तर व प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी, नागपूर | ३२५५७६६ /२००५ | कलम १३८ एनआय ॲक्ट | अमन के. हेमानी रा. हेमानी एन्क्लेव्ह, ९०, कॅनाल रोड, रामदासपेठ, नागपुर | ०४.०५.२०२६ |
| ८ | मा. १७वे सहदिवाणी न्यायाधीश क.स्तर व प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी, नागपूर | ३०७०१८५ /१९९७ | कलम ३२४,३४ भादंवि | १) अब्दुल शरीफ खान वय २२ वर्ष रा. ताजनगर, पाचपावली, नागपुर<br>२) राजु बलबिरसिंग मथानी वय ३२ वर्ष रा. प्लॉट क्र. २०७, | ०२.०५.२०२६ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | चॉक्स कॉलनी, जरीपटका नागपूर | |
| ९ | मा. १७ वे सहदिवाणी न्यायाधीश क.स्तर व प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी, नागपूर | ३०७००३१ /१९९७ | कलम ३२६,३४ भादंवि | मोहम्मद हुसेन उर्फ राजु वय २४ वर्ष रा. आझादनगर, टेका, नागपुर | ०२.०५.२०२६ |

**स्वा/—**

**( अंकुश राठोड )**

**पोलीस उप निरीक्षक,**

**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**

**नागपूर शहर.**